# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in    दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४   email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./3061/२०२२    दि. 05 /०९/२०२२

## सुचनापत्र

विषय :- "राष्ट्रीय सेवा योजना कक्षाकरीता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी" हे पद भरण्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. गो.वि./आस्था./१८८५/२०२२, दि. ३०/०५/२०२२
३. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय(३४/२२)/विशि-१/१११४९, दि. ०१/०९/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे असल्याने संदर्भ क्र. १ अन्वये पात्र उमेदवारांकडून आवेदन मागविण्यात आलेले होते. तथापि विषयांकीत पदास अल्प प्रतिसाद प्राप्त झाल्यामुळे अर्ज करण्यासाठी शासनाने मुदतवाढ दिलेली आहे.

करीता गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित इच्छुक व पात्र उमेदवारांनी संदर्भ क्र १ व २ चे अवलोकन करावे व **"मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स परिसर, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५"** या पत्यावर स्वयंसाक्षांकित केलेले संपुर्ण दस्तऐवज (शैक्षणिक प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणत्र व इतर आवश्यक दस्ताऐवज) संलग्न करुन अर्ज दि. २७/०९/२०२२ पर्यंत गोंडवाना विद्यापीठास पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

संलग्न - वरीलप्रमाणे

**(डॉ. अनिल हिरेखन)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सर्व प्रशासकीय / शैक्षणिक विभागांचे मा. विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर सुचनापत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

D:\GUG 2021-22\PARIPATRAK 2020-21\PARIPATRAK 2022\Paripatrak 7.0.Docx

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक-युएनआय/(३४/२२)/विशि-१ / ११९४९ दिनांक- 1 SEP 2022

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय- राष्ट्रीय सेवा योजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद भरण्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

संदर्भ- १. शासनाचे क्रमांक इएसटी-४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१ दिनांक २५ मार्च, २०२२
२.दैनिक लोकमत या वर्तमान पत्रातील दिनांक २१ मे, २०२२ रोजी प्रसिध्द झालेली जाहिरात
३.संचालनालयाचे समक्रमांक दि.२३ मे, २०२२ चे पत्र
४.शासनाचे क्रमांक इएसटी४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१ दि.१८ ऑगस्ट, २०२२
५.दैनिक सकाळ या वर्तमानपत्रातील दि.३१ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रसिध्द झालेली जाहिरात.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्रे पहावीत.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

1. He/ She should have served as programme Co-ordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.
2. He/ She should possess the academic qualifications for being appointed as programme Co-ordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
3. He/ She should have interest in Youth work in particular and social work in general.

तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. संपर्क अधिकारी हे पद सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) (सुधारित वेतनश्रेणी रुपये १३१४००-२१७१००) या संवर्गातील राहील.

२. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे.

३. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमत: एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तिचा कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.

४. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचा-यांचे रजेचे नियम लागू होतील.

५. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.

६. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.

७. पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वत:ला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांनी आपले अर्ज आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित अकृषि विद्यापीठांकडे आपल्या नियुक्ती प्राधिका-यामार्फत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित अकृषि विद्यापीठांकडे आपल्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांमार्फत सादर करावेत अशी जाहिरात दिनांक २१ मे,२०२२ रोजीच्या दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. तथापि सदर जाहिरातीस अल्प प्रतिसाद प्राप्त झाल्यामुळे अर्ज करण्यासाठी शासनाने मुदतवाढ दिलेली आहे. त्यानुसार दि.३१ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्याप्रमाणे संचालनालयाने दिलेल्या जाहिरातीचा मसुदा आपण आपल्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा. तसेच जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांनी आपणाकडे सादर केलेले अर्ज व आवश्यक ती संपुर्ण कागदपत्रे ही सोबतच्या तक्त्यात नमूद करुन या संचालनालयास दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत या संचालनालयास पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. जर आपल्या विद्यापीठाकडे अर्ज प्राप्त झाले नाही तर निरंक अहवाल पाठविण्यात यावा.

**तसेच अर्जासोबत संबंधित उमेदवारांचे गोपनीय अहवाल, सक्षम प्राधिका-यांनी प्रतिवेदन व पुर्नविलोकन केलेले जोडणे आवश्यक आहे.**

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रत- मा.श्री.द.रा.कहार, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | कार्यरत असलेल्या महाविद्यालय/ विद्यापीठाचे नांव | जन्म दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक / शिकविण्याचा अनुभव | शैक्षणिक अर्हता | गोपनीय अहवालाची प्रतवारी वर्षनिहाय | रुपये रु.१३१४००-२१७१०० या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती केलेला दिनांक | विद्यापीठामध्ये कार्यक्रम समन्वयक किंवा महाविद्यालयामध्ये कार्यक्रम अधिकारी पद धारण केलेला दिनांक<br>नेमणूकीचा एकूण कालावधी | राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षण कालावधी /दिनांक | विद्यापीठाचे अभिप्राय. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

### राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद भरण्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

1. He/ She should have served as programme Co-ordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.
2. He/ She should possess the academic qualifications for being appointed as programme Co-ordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
3. He/ She should have interest in Youth work in particular and social work in general.

तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. संपर्क अधिकारी हे पद सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) (सुधारित वेतनश्रेणी रुपये १३१४००-२१७१००) या संवर्गातील राहील.
२. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांवर प्रभुत्व असावे.
३. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पद्धतीने प्रथमतः एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तिच्या कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.
४. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचाऱ्यांचे रजेचे नियम लागू होतील.
५. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पद्धतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.
६. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखापरीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र, पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिद्ध सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.
७. पात्र उमेदवार मुंबईबाहेरील असल्यास त्याला स्वतःला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत आपले अर्ज आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित अकृषि विद्यापीठाकडे आपल्या नियुक्ती प्राधिकाऱ्यामार्फत सादर करावेत. तसेच सदर अर्जासोबत आपले मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवाल, सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रतिवेदन व पुनर्विलोकन केलेले अर्जासोबत जोडण्यात यावीत.

टीप : या पदासाठी दैनिक 'लोकमत' या वर्तमानपत्रातील सर्व आवृत्त्यामध्ये दि. २१ मे, २०२२ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज केलेले आहेत, त्यांनी नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- १.

डी.जी.आय.पी.आर. २०२२-२०२३/सी २६२०